नमुना प्रश्नपत्रिका

# सामाजिक शास्त्रे : भाग-१

## इतिहास व राज्यशास्त्र

वेळ : २ तास | इ. १०वी | गुण : ४०

सूचना :- १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

**प्र.१ अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ०३

१. अठराव्या शतकात औदयोगिक क्रांती प्रथम ______________ मध्ये झाली.
(रशिया, फ्रान्स, इंग्लंड)

२. पोर्तुगीज खलाशी ______________ हा भारताचा शोध घेण्यासाठी जलमार्गाने निघाला.
(कॅप्टन स्पेक, बार्थोलोम्यू डायस, स्टॅन्ले)

३. १९०४-०५ मध्ये झालेल्या युध्दात ______________ ने रशियाचा पराभव केला.
(जपान, जर्मनी, चीन)

**(ब) 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकाबरोबर योग्य जोडया लावा.** ०३

| 'अ' स्तंभ | 'ब' स्तंभ |
|---|---|
| १. ट्रीग्वे ली | (अ) भारत |
| २. पंडित नेहरु | (ब) अमेरिका |
| ३. आयसेन हॉवर | (क) रशिया |
| | (ड) नॉर्वे |

**प्र.२ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २५ ते ३० शब्दात लिहा. (कोणतेही दोन)** ०४

१. जपानला संन्याशी राष्ट्र का म्हणत असत ?
२. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी क्रांतीकारकांनी कोणता कार्यक्रम आखला?
३. पहिल्या महायुध्दाचे तत्कालिन कारण कोणते ?

**प्र.३ खालील विधानांची कारणे प्रत्येकी २५ ते ३० शब्दात लिहा (कोणतेही दोन)** ०४

१. युरोपात नवीन बाजारपेठांचा शोध सुरू झाला.
२. सुरक्षा समिती युनोचे हृदय होय.
३. वसाहतीमध्ये राष्ट्रवादी भावनेचा उदय झाला.

**प्र.४ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ४० ते ५० शब्दात लिहा. (कोणतेही दोन)** ०६

१. साम्राज्यवादाचे अनिष्ट परिणाम लिहा.

२. कार्लमार्क्सचे विचार थोडक्यात लिहा.

३. जागतिकीकरणाचे फायदे लिहा.

**प्र. ५ खालील प्रश्नांची ६० ते ८० शब्दात उत्तरे लिहा (कोणतेही दोन)** ०८

१. संगणकाचे विविध क्षेत्रातील उपयोग लिहा.

२. राष्ट्रसंघाची सामाजिक कार्ये लिहा.

३. दुसऱ्या महायुध्दाचे परिणाम लिहा.

## राज्यशास्त्र

**प्र. ६ कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** ०३

१. ______________ देशात अध्यक्षीय लोकशाही आहे.

(इंग्लंड, भारत, फ्रान्स)

२. स्त्री पुरुष तुलना हा ग्रंथ ______________ यांनी लिहिला

(ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे )

३. लोकांचा ______________ हा लोकशाही व्यवस्थेचा गाभा असतो

(विश्वास, सहभाग, प्रतिसाद )

**प्र. ७ खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा (कोणतेही तीन)** ०३

१. राजकीय पक्षाचे प्रमुख उद्‌दिष्ट कोणते असते ?

२. प्रत्यक्ष लोकशाही म्हणजे काय ?

३. प्रादेशिक विषमता म्हणजे काय ?

४. भारतातील कोणत्याही दोन धर्माची नावे सांगा.

५. विरोधी पक्ष कोणास म्हणतात ?

**प्र. ८ खालील विधाने चूक की बरोबर हे सकारण सांगा. (कोणतेही दोन)** ०४

१. लोकशाहीत अनेक राजकीय पक्ष असतात.

२. भारतात संसदीय लोकशाही आहे.

३. अमेरिकेत नागरिकांना शस्त्रे बाळगण्यावर बंधने नाहीत.

**प्र.९ खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर २५ ते ३० शब्दात लिहा.** ०२

१. विविध धर्माचे लोक शांततेने व गुण्यागोविंदाने एकत्र राहावेत म्हणून योजलेले कोणतेही दोन उपाय सांगा.

२. आर्थिक विषमता हे लोकशाहीपुढील एक आव्हान कसे आहे ते सांगा.

***